# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर

सं. क्र. काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. २, ३, ४, ५, ६ /२०१२-१३/ दिनांक :

| | |
|---|---|
| १) मे. बाफना कोल्ड स्टोरेज प्रा.लि. (केस क्र. २/२०१२-१३)<br>प्लॉट क्र. जी-३ /सी, एम.आय.डी.सी. कुपवाड,<br>ता. मिरज, जि. सांगली<br>२) मे. वरद कोल्ड स्टोरेज प्रा.लि. (केस क्र. ३/२०१२-१३)<br>गट नं. १८५३, तासगांव-सांगली रोड, कवठे एकंद,<br>ता. तासगांव, जि. सांगली<br>३) मे. गोमटेश कोल्ड स्टोरेज प्रा.लि. (केस क्र. ४/२०१२-१३)<br>प्लॉट क्र. जी-३ / एम.आय.डी.सी. कुपवाड,<br>ता. मिरज, जि. सांगली<br>४) मे. वर्धमान कोल्ड स्टोरेज प्रा.लि. (केस क्र. ५/२०१२-१३)<br>जी-५७, ५८, ५९, एम.आय.डी.सी. कुपवाड,<br>ता. मिरज, जि. सांगली<br>५) मे. गुरुगंगा कोल्ड स्टोरेज प्रा.लि. (केस क्र. ६/२०१२-१३)<br>प्लॉट क्र. जी-३ /ए, एम.आय.डी.सी. कुपवाड,<br>ता. मिरज, जि. सांगली | अर्जदार |

**विरुध्द**

| | |
|---|---|
| १) अधीक्षक अभियंता ,<br>म.रा.वि. वितरण कंपनी मर्यादित,<br>सं व सु मंडळ कार्यालय, विश्रामबाग, सांगली<br>२) कार्यकारी अभियंता/ नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>सं व सु मंडळ कार्यालय, विश्रामबाग, सांगली<br>३) कार्यकारी अभियंता,<br>म,रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>शहर / ग्रामीण विभागीय कार्यालय, सांगली | विरुध्द पक्षकार |

कोरम : १) श्री. बी.जी. पवार. अध्यक्ष
२) श्री. जी.सी. लेले. सदस्य
३) श्री. जी.बी. पानकर, सदस्य सचिव - रजेवर

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

This document was created using SmartPDFCreator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

## संयुक्त न्याय निर्णय

श्री. बी. जी.पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

१) या पाचही तक्रारी एका संयुक्त निकालाने निकाली काढण्यात येत आहे कारण की, यातील वितरण कंपनीविरुध्द तक्रारदाराची मागणी एकच आहे व वि.प.चा बचावही एक सारखाच आहे.

प्रस्तुत तक्रारींच्या सुनावणीचेवेळी श्री. जी.बी. पानकर, मंचाचे सदस्य सचिव वैयक्तिक कारणामुळे रजेवर होते.

२) केस क्र. २/२०१२-१३

मे. बाफना कोल्ड स्टोरेज प्रा.लि., प्लॉट क्र. जी-३ /सी, एम.आय.डी.सी. कुपवाड, ता. मिरज, जि. सांगली यांनी मंचाकडे अनुसूची अ मध्ये महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ मधील कलम ६.१० नुसार वितरण कंपनी शहर विभाग, सांगली, मंडल कार्यालय, सांगली यांचे विरुध्द तक्रार दि. ९.४.२०१२ रोजी दाखल केली. त्याचा तपशील खालील प्रमाणे -

तक्रारदार हे वितरण कंपनीचे शहर विभाग, सांगलीचे उच्चदाब ग्राहक असून त्यांचा ग्राहक क्र. २७९२४९००४८७० असा आहे. तक्रारदाराच्या अर्जातील गाऱ्हाणे योग्य वर्गवारीनुसार बिलींग व्हावे. तक्रारदारच्या म्हणण्यानुसार मा. विद्युत नियामक आयोग यांनी याचिका क्र. १११/२००९ मधील दि. १२.९.२०१० च्या आदेशानुसार दि. १.९.२०१० पासून नवीन टॅरीफ ऑर्डर लागू केलेली आहे. सदर टॅरीफ ऑर्डरनुसार लघुदाब प्रीकुलींग व कोल्ड स्टोअरेजचे वीज ग्राहकांना लघुदाब कृषि (LT- Ag.) वीज दर लागू करण्यात आले आहेत. तसेच उच्चदाब प्रीकुलींग व कोल्ड स्टोअरेज शेतकरी अथवा व्यापारी सर्व वीज ग्राहकांना उच्चदाब कृषि (HT- Ag.) वीज दर लागू करण्यात आले आहेत. आपल्या मागणी पुष्ट्यर्थ तक्रारदाराने वितरण कंपनीचे वाणिज्य परिपत्रक क्र. १२४ दि. १४.१०.२०१० चा आधार घेतला आहे. ग्राहकाने वि.प.कडे दि. १.९.२०१० पासून उच्चदाब कृषि (HT- Ag.) दराने आकारणी करावी ही मागणी समक्ष भेटून व त्यांच्या असोसिएशन मार्फत ऑक्टोबर २०१० मध्ये लेखी निवेदनाद्वारे केली त्याची प्रत तक्रारीसोबत जोडली आहे. तथापि अद्यापही त्यांची उच्चदाब औद्योगिक दराने आकारणी करण्यात येत आहे.

३) यापूवी ग्राहकाने दि. १.८.२००९ ते ३१.८.२०१० या कालावधीतील वीज दर आकारणी संदर्भात ग्राहकाने या मंचामध्ये गाऱ्हाणे क्र. २०७ ते २१३ /२०१० दाखल केले, त्यामध्ये दि. ३१.१२.२०१० रोजी ग्राहकाचे बाजूने आदेश झाला आहे. वि.प.ने मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट पिटीशन क्र. २६०८/२०११ दाखल केले. मा. उच्च न्यायालयाने वरील कालावधीतील परताव्यास स्थगिती दिली आहे. ग्राहकाने आपल्या मागणी पुष्ट्यर्थ मा. उच्च न्यायालयाचे दि. १६.१२.२०११ च्या आदेशाचा संदर्भ घेतला आहे. ग्राहकाचे म्हणण्यानुसार उच्च न्यायालयातील रिट पिटीशन हे दि. १.८.२००९ ते ३१.८.२०१० या कालावधीसाठी व मा. आयोगाच्या त्या आदेशापुरते मर्यादित आहे. त्यामुळे सन २०१०-११ व २०११-१२ यासाठी मा. उच्च न्यायालयाचे पुढील आदेशासंदर्भात योग्य मंचासमोर दाद मागण्याचे ग्राहकाच्या अधिकारास कोणतीही बाधा येत नाही असे स्पष्ट केले आहे. ग्राहकाच्या मते वि.प.ने उच्च न्यायालयासमोरील रिट पिटीशनमध्ये पॅरा क्र. २० पान क्र. ११ व १२ वर मा. आयोगाचे सप्टेंबर २०१० चे आदेशानुसार उच्चदाब कृषि दराने आकारणीस ग्राहक पात्र आहे असे मान्य केले असले तरी प्रत्यक्ष त्याची अंमलबजावणी केलेली नाही. रिट पिटीशनमधील पान क्र. ११ व १२ ची प्रत सोबत जोडली आहे.

This document was created using SmartPDFCreator. To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

ग्राहकाच्या म्हणण्यानुसार वि.प.ने आपल्या दि. १४.१०.२०१० च्या वाणिज्य परिपत्रकामध्ये प्रक्रीया केलेले / प्रक्रीया न केलेले असा नवीन व वाढीव मुद्दा घातला आहे. तथापि, मा. आयोगाच्या आदेशात असा कोणताही मुद्दा नाही. त्यामुळे अशा आदेशबाह्य अटी लागू होऊ शकत नाहीत. तसेच सदरचे परिपत्रक मार्गदर्शनपर असून प्रत्यक्ष अंमलबजावणी मा. आयोगाच्या आदेशानुसारच करावयाची आहे असे या परिपत्रकात शेवटी स्पष्ट केले आहे. ग्राहकाचे म्हणण्यानुसार मा. आयोगाच्या आदेशानुसार ते उच्चदाब कृषि वीज दर आकाणीस पात्र आहेत. मंचाकडून अपेक्षित मदत - मा.आयोगाचे आदेश व वि.प.चे परिपत्रक यानुसार उच्चदाब कृषि (HT-Ag) दराने आकारणी करणेत यावी त्यासाठी आवश्यक ते आदेश देणेत यावेत, दि. १.९.२०१० पासून ग्राहकाकडून उच्चदाब औद्योगिक दराने जादा वसूल केलेली रक्कम १२% व्याजासह परत मिळावी किंवा वीज बिलामध्ये समायोजित करावी. तसेच वि.प.कडून झालेली बेकायदेशीर आकारणी, त्यामुळे झालेला आर्थिक त्रास, भुर्दंड, मनस्ताप व अनावश्यक कालापव्यय या सर्व बाबींची नुकसान भरपाई म्हणून रु. २५,०००/- मिळावेत अशी मागणी केली आहे.

४) केस क्र. ३/२०१२-१३

मे. वरद कोल्ड स्टोरेज प्रा.लि. गट नं. १८५३, तासगांव-सांगली रोड, कवठे एकंद, ता. तासगांव, जि. सांगली मंचाकडे अनुसूची अ मध्ये महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ मधील कलम ६.१० नुसार वितरण कंपनी ग्रामीण विभाग, सांगली, मंडल कार्यालय, सांगली यांचे विरुध्द तक्रार दि. ९.४.२०१२ रोजी दाखल केली. त्याचा तपशील खालील प्रमाणे -

तक्रारदार हे वितरण कंपनीचे ग्रामीण विभाग, सांगलीचे उच्चदाब ग्राहक असून त्यांचा ग्राहक क्र. २८१५९९००४३७० असा आहे.

५) केस क्र. ४, ५, ६/२०१२-१३

मे.गोमटेश कोल्ड स्टोरेज प्रा. लि., मे. वर्धमान कोल्ड स्टोरेज प्रा.लि, मे. गुरुगंगा कोल्ड स्टोरेज प्रा.लि. एम.आय.डी.सी. कुपवाड, ता. मिरज, जि. सांगली यांनी मंचाकडे अनुसूची अ मध्ये महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ मधील कलम ६.१० नुसार वितरण कंपनी शहर विभाग, सांगली, मंडल कार्यालय, सांगली यांचे विरुध्द तक्रार दि. ९.४.२०१२ रोजी दाखल केली. त्याचा तपशील खालील प्रमाणे -

तक्रारदार मे.गोमटेश कोल्ड स्टोरेज प्रा. लि. हे वितरण कंपनीचे शहर विभाग, सांगलीचे उच्चदाब ग्राहक असून त्यांचा ग्राहक क्र. २७९२४९००४८४० असा आहे. तक्रारदार मे. वर्धमान कोल्ड स्टोरेज प्रा.लि. हे वितरण कंपनीचे शहर विभाग, सांगलीचे उच्चदाब ग्राहक असून त्यांचा ग्राहक क्र. २७९२४९००४४८० असा आहे. तक्रारदार मे. गुरुगंगा कोल्ड स्टोरेज प्रा.लि. हे वितरण कंपनीचे शहर विभाग, सांगलीचे उच्चदाब ग्राहक असून त्यांचा ग्राहक क्र. २७९२४९००६०९० असा आहे.

६) तक्रार क्र. २/१२-१३ मे. बाफना कोल्ड स्टोरेज प्रा.लि. मध्ये वर उल्लेख केलेला गाऱ्हाण्याचा तपशील व इतर चार केस क्र. ३, ४, ५ व ६ मधील गाऱ्हाण्याचे स्वरुप व तपशील एक सारखाच आहे व वितरण कंपनीविरुध्द मागणी उच्चदाब कृषि (HT-Ag) दराने आकारणी करणेत यावी ही सारखीच आहे. थोडक्यात, मा. आयोगाचे याचिका क्र. १११/२००९ मधील दि. १२.९.२०१० चे आदेशानुसार उच्चदाब कृषि (HT-Ag) दराने आकारणी व्हावी अशी मागणी केली आहे.

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

प्रस्तुत ग्राहकाने या मंचाकडे पूर्वी दाखल केलेल्या तक्रार अर्जावरील आदेशाचा संदर्भ देऊन वि.प.ने मा. उच्च न्यायालयात दाखल केलेल्या रिट पिटीशन क्र. २६०८/२०११ मधील मा. उच्च न्यायालयाच्या दि. १६.१२.२०११ च्या आदेशाचा संदर्भ घेतला आहे.त्यास अनुसरुन प्रस्तुत ग्राहकांनी या तक्रारी वि.प.विरुध्द वेगवेगळ्या कालावधीसाठी आणि मा. आयोगाच्या दि. १२.९.२०१० च्या आदेशानुसार दाखल केल्या असे म्हटले आहे.

७) वितरण कंपनीने आपल्या दि. ३०.४.२०१२ च्या नोडल ऑफीसर यांच्या लेखी अहवालात वि.प.चे वाणिज्य परिपत्रक क्र. १२४ दि. १४.१०.२०१० चा संदर्भ घेतला आहे. सदर परिपत्रकामध्ये-

(1) At point No. 11, applicability of agricultural tariff category to pre-cooling and cold storages on HT & LT voltage level is given, wherein it is mentioned that HT or LT agricultural tariff category shall be applicable for pre-cooling and cold storage for agricultural produce irrespective of whether pre-cooling and cold storage are being used by farmers or traders and irrespective of the ownership pattern in respect of supply on HT or LT side. In this case, care should be taken that this applicability is extended only to the cold storage of unprocessed agricultural produce only and not to any other cold storage and Ice Cream Parlors, Ice Factory etc.

(2) To convert raw grapes into Raisin (Bedana) following process is being done on raw grapes.

(a) In the mixture of 50 litres of water, 900 mili-litres of dipping oil and one kilo carbonate, 550 kilograms of grapes are dipped / immersed.
(b) After dipping, grapes are taken out and are kept on racks for drying. The racks are covered by the net.
(c) The mixture as mentioned above is sprayed for three times in a day on the grapes kept for drying on the racks in the net.
(d) then grapes are allowed to dry for 12 days on the racks.
(e) After drying for 12 days the grapes are squeezed through rotating drum. During this process Raisin (Bedana) are manufactured.
(f) Then raisins so manufactured are packed in the boxes and are sent to cold storage.

वि.प.ने आपल्या लेखी अहवालात मा. सर्वोच्च न्यायालयाचे मध्यप्रदेश राज्य सहकारी बँक, भोपाल विरुध्द कमिशनर ऑफ इन्कमटॅक्स, जबलपूर अपील क्र. ११९६/१९९२ मधील आदेशाचा संदर्भ घेतला आहे. मा. सर्वोच्च न्यायालयाचे या आदेशातील निरीक्षण -

SCC १९९६ (२), Page No. ५४१

That the agricultural produce produced by the agriculturist can legitimately be called agricultural produce in his hands, but in the hands of traders, it would be appropriate to call it agricultural commodities.

वि.प.ने आपल्या लेखी अहवालात पॅरा ४ मध्ये कार्यकारी संचालक (२) पुणे विभाग यांच्याकडून स्पष्टीकरण मागविले होते. त्यांच्या पत्रात -

This document was created using Smart PDF Creator. To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

It is mentioned that HT-V tariff is not tenable lookinginto decision dated 19.1.1996 of Hon ble Supreme Court of India in Civil Appeal No. 1196/1992 filed by Madhya Pradesh Rajya Sahakari Bank, Bhopal against Commissioner of Income tax, Jabalpur. Thus in this factory, processed dry grapes / Raisins / Kismis/ Bedana are stored.

त्यामुळे परिपत्रक क्र. १२४ नुसार

When a processed agricultural produce is stored, the applicable tariff is Industrial and not Agricultural. When an agricultural product is processed, it becomes industrial commodity.

शेवटी पॅरा ६ मध्ये

Mumbai Association of Cold Storage Owners stated that their business activity is clearly termed as Industry.

सदर असोसिएशनच्या पत्राची प्रत सोबत जोडली आहे. या सर्व कारणावरुन ग्राहकांची मागणी त्यांना Ag. Tariff लावावे ही विचारांत घेता येत नाही असे म्हटले आहे .

८) प्रस्तुत तक्रारीची सुनावणी मंचासमोर दि. ११.५.२०१२ रोजी घेण्यात आली असतां ग्राहकांचे प्रतिनिधी श्री. प्रताप होगाडे उपस्थित. वि.प.तर्फे नोडल ऑफीसर उपस्थित. श्री. होगाडे यांनी मा. आयोगाने वेळोवेळी मंजूर केलेल्या Ag. Tariff बाबतच्या आदेशाचा संदर्भ घेऊन शेवटी मा. विद्युत नियामक आयोग यांनी याचिका क्र. १११/२००९ मधील दि. १२.९.२०१० च्या आदेशानुसार दि. १.९.२०१० पासून नवीन टॅरीफ ऑर्डर लागू केलेली आहे. सदर टॅरीफ ऑर्डरनुसार लघुदाब प्रीकुलींग व कोल्ड स्टोअरेजच वीज ग्राहकांना लघुदाब कृषि (LT- Ag.) वीज दर लागू करण्यात आले आहेत. तसेच उच्चदाब प्रीकुलींग व कोल्ड स्टोअरेज शेतकरी अथवा व्यापारी सर्व वीज ग्राहकांना उच्चदाब कृषि (HT- Ag.) वीज दर लागू करण्यात आले आहेत. त्यानुसार वितरण कंपनीचे वाणिज्य परिपत्रक क्र. १२४ दि. १४.१०.२०१० लागू झाले आहे. या पाचही ग्राहकांची व इतर ग्राहकांची मागणी या मंचाने पारीत केलेल्या डिसेंबर २०१० ने मंजूर केली त्या आदेशाविरुध्द वेगवेगळे रिट पिटीशन उच्च न्यायालयात वि.प.ने दाखल केले आहेत, त्यात परताव्याच्या मागणीस तहकुबी आहे, हे श्री. होगाडे यांनी मान्य केले. परंतु दि. १.८.२००९ ते ३१.८.२०१० या कालावधीच्या पुढच्या कालावधीबाबत कार्यवाही करण्यासाठी ग्राहक मंचाकडे दाद मागू शकतात असे सागितले व त्या आदेशाची प्रत सोबत जोडली आहे. तसेच रिट पिटीशनच्या पॅरा १९ मध्ये वि.प.ने मा. आयोगाचे सप्टेंबर २०१० ची टेरिफ ऑर्डरचा संदर्भ घेतला आहे, त्यामुळे ती टेरिफ ऑर्डर मान्य आहे असे सांगण्याचा प्रयत्न केला. श्री. होगाडे यांनी वि.प.च्या अधिकाऱ्यांनी संदर्भ घेतलेले सर्वोच्च न्यायालयाचे केस लॉ प्रस्तुत तक्रारीला लागू होत नाहीत, कारण मा. आयोगाने हा मुद्दा विचारांत घेतला आहे वि.प.ने या आदेशाची अंमलबजावणी करण्याचे ठरविले आहे, तरीही वि.प.ने या बाबत कुठलीही कार्यवाही केलेली नाही. पूर्वीप्रमाणेच वीज दर आकारणी चालू ठेवली आहे. वि.प.ने या पाच ग्राहकांच्या बाबतीत भेदभाव करते मात्र इतर ग्राहकांना ९५% LT Ag. Tariff लागू केले आहेत. वि.प.च्या नाशिक विभागात अशा स्वरुपाचा टेरिफ लागू आहे असे सांगितले. मंचासमोर आपल्या म्हणण्यापुष्ट्यर्थ वि.प.चे दि. ३.५.२०१० चे मा. आयोगाला अग्रेषित केलेल्या पत्राचा / परिपत्रकाचा संदर्भ घेतला आहे.

This document was created using SmartPDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

तसेच वि.प.ने आपल्या परिपत्रकाच्या पॅरा ११ मध्ये बेदाणा processed foods आहे असे म्हटले आहे, परंतु मा. आयोगाने आपल्या आदेशात असे कुठेही म्हटले नाही. त्यामुळे मा. आयोगाच्या दि. १२.९.२०१० च्या आदेशानुसार प्रीकुलींग व कोल्ड स्टोअरेज या सर्व ग्राहकांना उच्चदाब कृषि (HT V : HT- Ag.) वीज दर लागू करण्याबाबत आदेश द्यावेत व जादा वसूल केलेल्या रकमेचा परतावा व्याजासह वीज बिलातून द्यावा अशी मागणी केली.

९) श्री. क्षीरसागर, नोडल ऑफीसर यांनी वाणिज्य परिपत्रक १२४ हे वि.प.ने मा. आयोगाच्या आदेशानुसार काढले आहे, ते बंधनकारक आहे. त्यातील पॅरा ११ चा संदर्भ घेऊन लघुदाब कृषि (LT-Ag) टेरिफ हे Unprocessed food साठी लागू होईल. तक्रारदार ग्राहक हे साठवणूक करीत असलेले बेदाणा हे Processed food आहे. तक्रार फेटाळण्यात यावी. यासाठी सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचा संदर्भ घेतला आहे.

वरील विवेचानावरुन खालील मुद्दा निर्णयासाठी उपस्थित होत आहे.

१) या सर्व ग्राहकांना उच्चदाब कृषि (HT- Ag.) दराने आकारणी करण्याबाबतचे आदेश वि.प.ला देणे योग्य व कायदेशीर होईल का ?

उत्तर : होय

२) ग्राहकांनी मागणी केल्याप्रमाणे वितरण कंपनीविरुध्द त्यांना रु. २५,०००/- भरपाई मंजूर करणे योग्य होईल काय ?

उत्तर : नाही

आदेश ?

खालील प्रमाणे.

## कारणमिमांसा

१०) उभयबाजूंच्या लेखी / तोंडी कथनानुसार खालील बाबी दोघांना मान्य आहेत. या सर्व तक्रारीतील ग्राहक हे वि.प.चे उच्चदाब ग्राहक आहेत व त्यांना वि.प.कडून प्रचलित उच्च औद्योगिक दराने आकारणी करणेत येत आहे. तसेच मा. आयोगाचे याचिका क्र. १११/२००९ मधील दि. १२.९.२०१० चे आदेशानुसार नवीन टेरिफ ऑर्डर लागू केली आहे. त्यानुसार लघुदाब प्रीकुलींग व कोल्ड स्टोअरेच वीज ग्राहकांना लघुदाब कृषि (LT- Ag.) वीज दर लागू करण्यात आले आहेत. तसेच उच्चदाब प्रीकुलींग व कोल्ड स्टोअरेज शेतकरी अथवा व्यापारी सर्व वीज ग्राहकांना उच्चदाब कृषि (HT- Ag.) वीज दर लागू करण्यात आले आहेत. तसेच वितरण कंपनीने वाणिज्य परिपत्रक क्र. १२४ दि. १४.१०.२०१० लागू केले आहे.

तक्रारीतील मागण्याकडे वळण्यापूर्वी वि.प.ने या मंचाने यापूवी गाऱ्हाणे क्र. २०७ ते २१३ /२०१० मध्ये दि. ३१.१२.२०१० रोजी आदेश दिले त्यास वि.प.ने मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे वेगवेगळ्या रिट पिटीशन आव्हान दिले आहे. त्यामध्ये मा. उच्च न्यायालयाने दि. १.८.२००९ ते ३१.८.२०१० या कालावधीत जादा वसूल केलेल्या रकमेच्या परताव्यास स्थगिती दिली आहे. तक्रारदाराचे प्रतिनिधी यांनी मा. उच्च न्यायालयाचे दि. १६.१२.२०११ चे रिट पिटीशन क्र. २६०८/२०११ मधील आदेशातील पॅरा ७ मधील निरीक्षणानुसार या याचिकेचा निर्णय होईपर्यंत Interim relief मंजूर करण्यात आलेला आहे.

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

या आदेशात पुढे असे निरीक्षण केले आहे की,

It is clarified that if it is the grievance of the Respondents that the Petitioner is billing them on HT Industrial Rate, which according the Respondents is contrary to the Tariff Order passed by the MERC for the year 2010-11, the Respondents will have their independent remedies under the Electricity Act, 2003 either by raising a dispute regarding bills either under Section 42 or any other provisions under the Electricity Act, 2003.

It is clarified that pendency of this Writ Petition or grant of interim relief in favour of the Petitioner will not preclude the Respondents from raising such a dispute regarding non implementation or improper implementation of the Tariff Order for the year 2010-11 before appropriate forum and all contentions of both the parties in that regard will be open for debate before such forum since the dispute in respect of the period after September, 2010 is not the subject matter of this Writ Petition.

मा. उच्च न्यायालयाचे या आदेशाच्या अनुषंगाने या मंचाचे असे मत झाले आहे की, तक्रारदारांनी या गाऱ्हाण्यामध्ये दि. १.९.२०१० पासून उच्च औद्योगिक दराने जादा घेण्यात आलेली रक्कम १२% व्याजाने परत मिळावी अशी मागणी केली आहे. त्यामुळे मा. उच्च न्यायालयाकडे प्रलंबित याचिकेतील दि. १६.१२.२०११ तहकुबी आदेश विचारांत घेता, तक्रार मंचापुढे चालू शकते. प्रस्तुत ग्राहकांच्या तक्रारीत मांडलेले मुद्दे व तक्रारदाराचे प्रतिनिधी यांना मंचापुढे केलेले कथन या नुसार सदरच्या आदेशाने ग्राहकांच्या अधिकारास कोणतीही बाधा येत नाही हे म्हणणे ग्राह्य धरावे लागेल असे मंचाचे मत आहे.

११) मा. आयोगाचे आदेश स्वयंस्पष्ट आहेत असे म्हणावे लागते. तक्रारी सोबत केस क्र. १११/२००९ मधील High Tension (HT) Tariff या सदरा खालील पान क्र. २१९/२३४ ते २२४/२३४ जोडले आहे.

HT V : HT - Agricultural

Applicability

Applicable for High Tension Agricultural Pumping loads, including HT Lift Irrigation Schemes (LIS) irrespective of ownership and also for

(i) Poultry ( exclusive for Layer and Broiler Activities ),
(ii) High Tech Agricultural ( i.e. Green Houses, Tissue Culture, Mushroom, etc. ) purpose ;
(iii) Pre-cooling and cold storage for agricultural produce.

Note :

Above shall be applicable irrespective of whether pre-cooling and cold storage are being used by farmers or traders, and irrespective of the ownership pattern.

This document was created using Smart PDF creator. To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

या अनुषंगाने मंचाचे असे मत झाले आहे की, मा. सर्वोच्च न्यायालयाचे दि. १९.१.१९९६ च्या सिव्हील अपील क्र. ११९६ ऑफ १९९२ मधील निरीक्षणाचा वि.प.ला फायदा होऊ शकत नाही.

The agricultural produce produced by the agriculturist can legitimately be called agricultural produce in his hands, but in the hands of traders, it would be appropriate to call it agricultural commodities. It would not be his agricultural produce.

मा. आयोगाचेआदेश पान २२३ वर उल्लेख केलेली नोट विचारांत घेता, वि.प.ने आपल्या लेखी अहवालात म्हटल्याप्रमाणे Unprocessed agricultural produce only किंवा यासाठीच मा. आयोगाचे आदेश लागू आहेत हे म्हणणे ग्राह्य धरता येणार नाही. नोडल ऑफीसर श्री. क्षीरसागर यांनी सदर परिपत्रकाच्या क्र. ११ तील मजकूराचा संदर्भ देऊन या परिपत्रकाच्या अनुषंगाने मा. आयोगाच्या आदेशानुसार वि.प.ने कार्यवाही केली आहे असे सांगण्याचा प्रयत्न केला.

११) Applicability of Agricultural Tariff category to pre-cooling and cold storage on HT and LT voltage level :

HT or LT Agricultural Tariff category shall be applicable for pre-cooling and cold storage for agricultural produce irrespective of whether pre-cooling and cold storage are being used by farmers or traders, and irrespective of the ownership pattern in respect of supply on HT or LT side. In this case, care should be taken that this applicability is extended only to the Cold Storage of unprocessed agricultural produce only and not to any other Cold Storage and Ice Cream Parlors, Ice Factory etc.

या ठिकाणी मंचाला खेदाने असे नमूद करावेसे वाटते की, वर उल्लेख केलेल्या मा. आयोगाचे आदेशात Unprocessed Agricultural Produce असा कुठेही उल्लेख केलेला नाही. या उलट, नोटमध्ये

Above shall be applicable irrespective of whether pre-cooling and cold storage are being used by farmers or traders.

त्यामुळे Unprocessed Agricultural Produce असलेले Cold Storage यालाच मा.आयोगाचे आदेश लागू होतात असे म्हणता येणार नाही. यामुळे वि.प.चे लेखी अहवालातील पॅरा २ मधील म्हणणे - कच्चे द्राक्षे बेदाणा होण्यासाठी कच्च्या द्राक्षावर प्रोसेस करावी लागते, त्यामुळे हे processed food (बेदाणा) Agricultural Produce होते, असे म्हणता येणार नाही आणि दि. १४.१०.२०१० च्या परिपत्रकातील पॅरा ११ मधील सूचना या निश्चितपणे मा. आयोगाच्या आदेशानुसार आहेत असे म्हणता येणार नाही.

वि.प.चे दुसरे म्हणणे की, कार्यकारी संचालक (२) पुणे विभाग यांचेकडून स्पष्टीकरण मागविले होते, त्यांच्या दि. ८.३.२०१० च्या पत्रानुसार -

HT-II (Commercial Tariff ) is most appropriate in the instant case because as per the provisions of the Tariff Order while applying HT-I Tariff, it is necessary to ascertain that the industry should have a manufacturing activity or activities as envisaged in the Tariff Order.

This document was created using Smart PDF Creator. To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

श्री. होगाडे यांनी वि.प.चे दि. ३.५.२०१० चे परिपत्रक मंचाचे निदर्शनास आणले. त्यामध्ये वि.प.ने मा. आयोगाला अशाप्रकारे Classification Tariff Order बदलण्याची विनंती केली आहे, परंतु त्या पत्राची प्रत मंचासमोरील प्रस्तुत पाचपैकी एकाही केसमध्ये उपलब्ध नाही. असे असले तरी, वि.प.ने लेखी अहवालात आणि मंचासमोर तोंडी घेतलेला बचाव की, agricultural produce in the hands of traders हे agricultural commodities हे ग्राह्य धरता येणार नाही. त्यामुळे या सर्व तक्रारदारांनी मागणी केल्याप्रमाणे वितरण कंपनीने ग्राहकांना दि. १.९.२०१० पासून उच्चदाब कृषि (HT- Ag.) दराने आकारणी करण्यात यावी व यापूर्वी दि. १.९.२०१० पासून जादा वसूल करण्यात आलेली रक्कम बिलातून परत देण्याचे आदेश करणे योग्य होईल असे मंचाचे मत झाले आहे. मुद्दा क्र. १ चे उत्तर होय असे देण्यात येत आहे.

१२) ग्राहकाने दरमहा झालेला आर्थिक त्रास, भुर्दंड मनस्ताप, व अनावश्यक कालापव्यय अशा विविध कारणावरुन रु. २५,०००/- भरपाई मागितली आहे. यासाठी ग्राहकाने अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली येथे दि. ७.१.२०१२ रोजी अर्ज दिल्याचे दिसते. केस क्र. ६ - मे. गुरुगंगा कोल्ड स्टोरेज प्रा.लि. मध्ये अंतर्गत कक्षाकडील अर्जात तक्रारदाराने भरपाईची मागणी केलेली नाही. मे. वर्धमान कोल्ड स्टोरेज प्रा.लि. यांनी अधीक्षक अभियंता सांगली यांच्याकडे दि. ११.११.२०१० रोजी केलेल्या अर्जात अशी भरपाईची मागणी केलेली नाही तसेच दि. २०.१.२०११ च्या अर्जात मागणी केलेली नाही. मे. बाफना कोल्ड स्टोरेज प्रा.लि. मध्ये दि. ३१.१.२०११ अधीक्षक अभियंता सांगली यांच्याकडे केलेल्या अर्जात अशी मागणी केलेली नाही तसेच दि. ७.१.२०१२ च्याअंतर्गत कक्षाकडे केलेल्या अर्जात अशी मागणी केलेली नाही. तसेच मे. वरद कोल्ड स्टोरेज प्रा.लि. यांनी अंतर्गत कक्षाकडे केलेल्या दि. ७.१.२०१२ च्या अर्जात अशी मागणी केलेली नाही.

अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे जाण्यापूर्वी या ग्राहकांनी अधीक्षक अभियंता सांगली मंडल यांना टेरिफ बदलून मिळण्यासाठी केलेल्या अर्जात भरपाईची मागणी केलेली नाही. वि.प.च्या अधिकाऱ्यांस दिलेले पत्र हे सुध्दा गाऱ्हाणे होते, हे अधिनियमानुसार स्पष्ट होते. अशाप्रकारे तक्रारदारांनी एकाही अर्जात भरपाईची मागणी केली नसतांना प्रथमच मंचासमोर रु. २५०००/- भरपाईची मागणी केली आहे. मंचाचे असे मत झाले आहे की, भरपाईसाठी दिलेली कारणे व त्या अनुषंगाने मागणी proportionate compensation याचा मेळ बसत नाही. कुठल्या कारणासाठी भरपाई व वस्तुत: अशी कारणे किंवा मागणी सबळ पुराव्याने सिध्द केले नाही, त्यामुळे भरपाईची मागणी फेटाळण्यात येत आहे. मुद्दा क्र. २ चे उत्तर नाही असे देण्यात येत आहे.

ग्राहकाने परताव्याच्या रकमेवर १२% व्याजाची मागणी केली आहे. दि. १२.९.२०१० ला मा. आयोगाचे याचिका क्र. १११/२००९ मध्ये आदेश झाले. यापूर्वीच्या तक्रारीमध्ये डिसेंबर २०१० ला मंचाने ग्राहकांना परताव्याच्या रकमेवर व्याज मंजूर केले आहे, परंतु मा. उच्च न्यायालयाची सदरच्या परताव्यास पर्यायाने त्यावर मिळणाऱ्या व्याजावर तहकुबी आहे, त्यामुळे पूर्वीच्या आदेशातील परताव्यावर व्याज त्या दराने मंजूर करता येणार नाही. ग्राहकाने परताव्याची रक्कम वीज बिलातून समायोजित करण्याची विनंती केली आहे. प्रस्तुत केसमध्ये आकारणी ही Ag.Category मधील नसल्यामुळे ग्राहक परताव्याच्या रकमेस हक्कदार आहेत. विद्युत कायदा २००३ कलम ६२.६ नुसार ग्राहकास अशा रकमेवर व्याज देणे वितरण कंपनीवर बंधनकारक आहे. मा.आयोगाचे दि. १२.९.२०१० चे आदेश असूनही प्रथमत: दि. ७.१.२०१२ रोजी अंतर्गत कक्षाकडे गाऱ्हाणे दाखल केले आहे. या व इतर कारणांवरुन परताव्याच्या रकमेवर ९% व्याज देणे योग्य होईल असे मंचाचे मत झाले आहे, त्यामुळे ९% दराने व्याज मंजूर करणेत येत आहे.

This document was created using SmartPDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

ग्राहक प्रतिनिधींनी मंचासमोर वि.प.ने इतर Cold Storage ग्राहकांना मा. आयोगाच्या आदेशानुसार टेरिफ बदलून दर लावले आहेत, परंतु या ५ ग्राहकांच्या बाबतीत वि.प. भेदभाव करीत आहे अशी तक्रार मांडली. त्याबद्दल वि.प.चे नोडल ऑफीसर यांनी मंचासमोर प्रत्यूत्तर दिले नाही.

वरील विवेचनावरुन, खालील प्रमाणे आदेश मंच देत आहे.

## आदेश

१) तक्रार अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२) वितरण कंपनी सांगली मंडल यांनी या सर्व ग्राहकांना मा. विद्युत नियामक आयोग केस क्र. १११/२००९ मधील दि. १२.९.२०१० च्या आदेशानुसार उच्चदाब कृषि (HT- Ag.) दराने वीज बिलाची आकारणी करावी. यापूर्वी या तक्रारदारांची औद्योगिक दराने झालेली व वसूल केलेली विद्युत बील आकारणीचा परतावा दि. १.९.२०१० पासून करावा. परताव्याची रक्कम ग्राहकाच्या पुढील बिलात समायोजित करण्यात यावी. सदरच्या रकमेवर दि. १.९.२०१० पासून परतावा बिलातून समायोजित होईपर्यंतच्या कालावधीसाठी ९% दराने व्याज द्यावे व तसा अहवाल मंचास द्यावा.

३) ग्राहकाने मागणी केलेली भरपाई रक्कम रु. २५,०००/- ची मागणी फेटाळण्यात येत आहे.

४) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

५) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखे-पासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

दिनांक : ४.६.२०१२

( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. जी. सी. लेले, सदस्य :

श्री. जी. बी. पानकर, सदस्य सचिव : रजेवर

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

This document was created using SmartPDFCreator To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com